Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN No : 2230-7850 Impact Factor : 3.1560 (UIF) [Yr. 2014]

ISSN2230-7850 Impact Factor:3.1560 (UIF) Volume - 5 | Issue - 12 | Jan- 2016





कांतराव किसनराव कलाणे



# शिवकालिन स्वराज्याचा प्राण- गडकोट

कांतराव किसनराव कलाणे
(इतिहास विभाग प्रमुख), महिला कला महाविद्यालय, बीड

***प्रस्तावना :***

भारतीय युध्दशास्त्रात अगदी प्राचीन काळापासून किल्ल्यांना महत्वाचे स्थान आहे. प्राचीन राजनीतिज्ञ शुक्राचार्य यांनी किल्ल्यांचे महत्व वर्णन करताना म्हटले आहे की, ''किल्ल्याच्या आश्रयाने एक सशस्त्र माणूस 100 योद्ध्याशी लढू शकतो व 100 योध्दे 10,000 माणसांशी लढू शकतात. यास्तव राजाने किल्ल्याचा आश्रय करावा.''[1] यावरून गडकिल्ल्याचे महत्व व त्याची आवश्यकता याची जाणिव भारतीय राज्यकर्त्यांना प्राचीन काळापासून असल्याचे दिसून येते. मात्र गडकिल्ल्यांचे ख-या अर्थाने महत्व मध्ययुगातील छत्रपती शिवाजी महाराजांइतके इतर एकाही भारतीय राज्यकर्त्यांना कळाले नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्रीच्या अंगाखांद्यावर गडकोटांचा साज चढवला आणि सर्वसामान्य मावळ्यांच्या साथीनं व याच गडकिल्ल्यांच्या आश्रयाने स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. हे मध्ययुगातील त्यांचे कार्य एकमेवाद्वितीय होय.

शिवकालिन गडकिल्ले हे महाराष्ट्राचं ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संचित होय. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जडण-घडणीची साक्ष असणारे हे बुलंद किल्ले! डोंगरी किल्ले ही तर महाराष्ट्राची शान होय. जगातल्या कुठल्याही प्रदेशात नसतील एवढे डोंगरी किल्ले महाराष्ट्रात आहेत. डोंगर कोरण्याची कला शिवकाळात गतिमान झाली होती, हेच यावरून स्पष्ट होते. शिवाजी महाराजांचा जन्म दुर्गात झाला. महाराजांना जे वैभव प्राप्त झाले तेही सर्व दुर्गांच्यामुळे व त्यांच्या ताब्यातील दुर्गांना जे सामर्थ्य प्राप्त झाले तेही त्यांच्याच प्रयत्नाने झाले. शिवरायांचे दुर्ग म्हणजे भारतातील त्यांच्या शत्रूंना धाक होता, त्यांच्या राष्ट्राची ती संवर्धन भूमी होती, त्यांच्या विजयाचा तो पाया होता, त्यांच्या वाढत्या महत्वाकांक्षेचा तो जिना होता. दुर्ग हेच त्यांचे निवासस्थान आणि तेच त्यांच्या आनंदाचे निधान होते.''[2] थोडक्यात गडकोटामध्येच जन्मलेला, आयुष्यभर गडकोट जिंकण्याचा ध्यास लागलेला गडकोटावर निरतिशय प्रेम करणारा, एका अजय दुर्गावर स्वतःची राजधानी निर्भिणारा, तिथेच स्वतःला राज्याभिषेक करवून घेणारा आणि अंतिम श्वासही त्याच दुर्गावर घेणारा महापुरूष एक शिवछत्रपती वगळता इतिहासात दुसरा कोणी झाला नाही.

**उद्देश :-**

1) शिवकालिन दुर्गाचे महत्व जाणून घेणे.

2) राज्यनिर्मितीबरोबरच राज्य संरक्षण आणि राज्यविस्तार यासाठी गडकिल्ल्यांना असणारे महत्व याचा आढावा घेणे.

3) शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात गडकिल्ल्यांना दिलेले महत्व अभ्यासणे.

4) शिवाजी महाराजांमध्ये असलेले दुर्गनिर्मितीशास्त्राचे ज्ञान याचा सखोल अभ्यास करणे.

**गृहितकृत्ये :-**

1) मराठ्यांच्या इतिहासामध्ये किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले दिसून येते.

2) शिवकालिन गडकिल्ले हे महाराष्ट्राचं ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संचित आहे.

**शिवकालिन एकूण किल्ले :-**

साधनांच्या तपशिलात गेल्यानंतर शिवकालिन किल्ल्यांची संख्या वेगवेगळी पहावयास मिळते. चित्रगुप्त बखरीनुसार 361, मल्हार रामराव चिटणीस बखरीनुसार 317, रायगडची जीवनगाथा यामध्ये लेखक शां.वि. आवळसकर यांच्या मते 360, डॉ. बाळकृष्ण यांच्या शिवचरित्रानुसार 350 तर सभासदांच्या परिगणनेप्रमाणे शिवकालिन किल्ल्यांची संख्या 240 एवढी सांगितली आहे.[3] पुढे सभासद या किल्ल्याचे विवरण पुढीलप्रमाणे करतात. एकूण 240 गडकिल्ल्यांपैकी प्रथम पन्नास गड, एकशे अकरा राजियांनी वसविले, 79 कर्नाटक प्रांतीचे असा तपशील देतात.[4]

वरील सर्व आकडेवारी पाहता शिवकाळात जवळपास 250 ते 300 एवढे गडकिल्ले होते. याबद्दल शंका नाही हे गडकिल्ले हीच शिवाजी महाराजांची खरी दौलत होती, असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.

**शिवकालिन किल्ल्याचे वर्गीकरण :-**

शिवकालिन किल्ल्याचे घाटमाथ्यावरील किल्ले, देशावरील किल्ले, कोकणातील किल्ले, कर्नाटकातील किल्ले व सागरी किल्ले असे वर्गीकरण करता येईल. घाटमाथ्यावरील किल्ल्यांमध्ये शिवनेरी, सिंहगड, पुरंदर, राजगड, तोरणा, रायगड, प्रतापगड, विशालगड, पन्हाळगड इ. काही महत्वाच्या किल्ल्यांचा समावेश होतो. या घाटमाथ्यावरील किल्ल्यांना शिवकाळात अनन्यसाधारण महत्व होते. कारण याच भागातून शिवाजी महाराजांनी अदिलशाही, मोगली शत्रूंशी यशस्वी सामना केला.शिवाय राजधानीचे गडही याच भागातील होते.

महाराष्ट्राच्या पठारात किंवा देश या विभागात मोडणारी सातमाळा अजिंठे या डोंगरांच्या रांगेत असलेल्या गिरीदुर्गांना टेहळणीच्या व संरक्षणाच्या दृष्टीने महत्वाचे स्थान होते. या रांगेतील किल्ल्यांचे दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे किल्ल्याच्या प्रवेशासाठी मुद्याम तयार केलेले व खडकात कोरलेले भुयारी मार्ग, हरिश्चंद्रगड, चांदवड, घोडप, हातगड, अंकाई, टंकाई इ. गिरीदुर्ग या भागातील रक्षणासाठी महत्वाचे होते.

कोकणातून देशावर येण्यासाठी निरूंद असलेले अनेक घाट उत्तुंग पर्वतराजीमध्ये आहेत. या घाटाच्या परिसरात मोक्याच्या जागी गिरीदुर्ग स्थापन करून संरक्षण व्यवस्था मजबूत केली होती. यामध्ये भिवगड, मानगड, लिंगाणा,रायगड, विशालगड, प्रतापगड इ. काही महत्वाचे किल्ले होते.

कर्नाटक मोहिमेवर असताना शिवाजी महाराजांनी अनेक किल्ले जिंकून घेतले. यामध्ये जिंजी, बेलवडी, वेलूर, कोप्पळ इ. प्रमुख किल्ल्यांचा समावेश होतो. सभासदांनी कर्नाटकातील शिवाजींच्या किल्ल्याची माहिती देताना 'कर्नाटक प्रांतीचे 79'[5] असा उल्लेख केला आहे. मात्र निश्चित आकडा सांगता येणे शक्य नसले तरी शिवाजी महाराजांनी कर्नाटक मोहिमेवर असताना जे किल्ले मिळवले त्याची दुरूस्ती व अद्ययावत बांधकाम याकडे कटाक्षाने लक्ष दिल्याचे दिसून येते.

पाश्चात्य सत्तांचे सामर्थ्य सागरात आहे हे ओळखून शिवाजी महाराजांनी आपला पश्चिम किनारा सुरक्षित करण्यासाठी अनेक नविन जलदुर्ग उभारले, तसेच जुन्यांची डागडूजी केली. सिंधुदुर्ग, पदमदुर्ग, विजयदुर्ग,सुवर्णदुर्ग, खांदेरी-उंदेरी हे त्यापैकी काही महत्वाचे सागरी किल्ले होत.

**स्वतंत्र आरमार :-**

शिवाजी महाराजांनी सागरी किल्ल्यांबरोबरच आपले आरमारी सामर्थ्य वाढवण्याचा योजनापूर्वक प्रयत्न केला. कारण एक ना एक दिवस पाश्चात्य सत्तांशी आपल्याला सामना करावा लागणार आहे, त्यासाठी स्वतंत्र आरमार असणे आवश्यक आहे हे जाणून शिवरायांनी आपली सागरी शक्ती वाढवली. मध्यकाळात आरमाराचे महत्व जाणणारे शिवाजी महाराज हे पहिले भारतीय राज्यकर्ते होते.म्हणूनच त्यांना भारतीय आरमाराचे जनक म्हणून ओळखले जाते. अमात्यांनी आज्ञापत्रात म्हटल्याप्रमाणे 'आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे....... ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र..... त्यास ही हट्टी जात (पाश्चात्य सत्ता) हातात आले स्थळ मेल्यानेही सोडावयाचे नाहीत.'[6] पाश्चात्यांची ही प्रवृत्ती जाणनूच शिवरायांनी जलदुर्ग आणि आरमाराची उभारणी केली होती.

**किल्ले बांधणी व दुरूस्ती :-**

शिवकालिन बांधकामाचा विचार करता किल्ल्यांचे बांधकाम, त्यावरील इमारती, किल्ल्यांची दुरूस्ती इ.बाबी प्रामुख्याने नजरेसमोर येतात. कारण 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग.दुर्ग नसता मोकळा देश परमचक्र येताच निराश्रय प्रजा भग्न होऊन देश उध्वस्त होतो.' असे शिवकालिन राजनीति सांगते.[7]

सारांश शिवाजी महाराजांनी गडावरून राज्य केले हे सर्वश्रुत आहे. जुने किल्ले दुरूस्त केले, नविन किल्ले बांधले, त्यांची तटबंदी भक्कम केली. गडकिल्ल्यांचे महत्व शिवाजी महाराजांना किती होते. गडाच्या बांधणी बाबतचे त्यांचे धोरण काय होते याचे सुंदर प्रतिबिंब आज्ञापत्रात पहावयास मिळते. आज्ञापत्रानुसार, ''देशोदेशी स्थळे पाहून, किल्ले बांधावे. किल्ल्यांसमीप दुसरा पर्वत असू नये. कदाचित असला तर सुरूंग लावून गडाचे आहारी आणावा. सुरूंगास असाध्य असला तर ती जागा मोकळी न सोडता बांधून मजबूत करावी. तट, बुरूज, चिलखते, पहारे, पडकोट जेथे जेथे असावे ते मजबूत बांधावे. नाजूक जागा ज्या असतील त्या सुरुंगति प्रयत्नांनी अवघड करून पक्की इमारत बांधून गडाचा अैब टाळावा. खालून होऊ शकणारा मारा चुकविता येईल असे दरवाजे बांधावे.दरवाजांचे पुढे बुरूजांचा रोख येता जातानाच्या मार्गावर असेल अशी रचना करावी. गडाचा आकार पाहून एक, दोन किंवा तीन दरवाजे व तशाच चोर दिंड्या कराव्या त्यापैकी ज्यांच्यातून रोजचा राबता असेल तेवढेच उघडे ठेवून बाकीचे दरवाजे व दिंडया चिणून टाकाव्या. भूईकोट किल्ला असेल तर तटाभोवती खोल व रूंद खंदक खणून ठेवावा. गडाची राखण करण्याकरिता झाडी वाढवावी.गडाभोवती नेहमी मेढे

असावे.गडाखाली इमारतीचे घर किंवा घराभोवती दगडाचे कुसू कधीही असू न द्यावे. गड बांधताना पाण्याची सोय मुख्यतः पहावी, गडावर तळी किंवा टाकी बांधावी. गडावरील मुख्य बांधकाम म्हणजे राजवाडा. राजवाड्याच्या भिंती विटांच्या बांधून त्यास चुना दाट गच्च द्यावा. उंदीर, विंचू, मुंग्या राहतील अशी फट ठेवू नये. घरास कुसू निर्गुडी आदिकरून झाडांचे पातळ घालावे. दारूखाना घरापासून दूर बांधावा तो भोवती निर्गुडी आदि करून झाडाचे दाट कुसू घालून बांधावा. त्यात तळघर करावे, तळघरात गच करावा. त्यास माच घालून त्यावर दारूचे बस्ते, मडकी ठेवावी, तटास झाडे वाढली की ती खणून काढावी. तटावरील गवत जाळून टाकावे. गडावरून मात्र झाडे भरपूर वाढवावी.[8] शिवकालिन किल्ल्यांच्या बांधकामाचा आज्ञापत्रातील वरील तपशील पाहिल्यानंतर शिवाजी महाराज किल्ल्यांच्या बांधकामाच्या बाबतीत किती जागरूक/दक्ष होते तसेच संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्याला किती महत्व देत होते याची प्रचिती येते.

किल्ले बांधकाम व दुरूस्तीबाबतचे आणखी एक उदाहरण आपणास त्यांच्या कर्नाटक मोहिमेसंदर्भातील पहावयास मिळते. वेलोरचा किल्ला जिंकल्यानंतर शिवरायांनी भारतातील मुस्लिमांचे बळ लक्षात घेऊन भविष्यकाळात त्यांच्या सामर्थ्याला प्रतिकार करता यावा म्हणून किल्ल्यांची डागडुजी व इतर बंदोबस्त करण्यास सुरूवात केली. निसर्गतःच दुर्गम असलेल्या जिंजी किल्ल्याची डागडूजी केली. पहिले तट पाडून नवे तट व बुरूज कौशल्याने बांधले. पाश्चात्यांच्या पध्दतीने अवलंबन करून मोठे खडक फोडले, तलाव बांधले आणि युध्दोपयोगी इतर इमारती बनविल्या. हे सर्व करताना वेळ प्रसंगी त्यांनी भारतीय कारगिरांबरोबरच पाश्चात्य कुशल कारागिरांचीही मदत घेतली. याचे उदाहरण द्यायचे झाले तर शिवाजी महाराजांनी फोर्ट सेंट जॉर्जच्या प्रेसिडेंटला 22 सप्टेंबर, 1677 ला लिहिलेल्या पत्रातून पहावयास मिळते. सदरिल पत्रात शिवाजी महाराज म्हणतात, ''मी कर्नाटकात आल्यापासून अनेक किल्ले जिंकले, कित्येक किल्ल्या-किल्यात मला नवीन बांधकामे करावयाची आहेत. मोठ्या तोफांचे गाडे कसे करावेत आणि सुरूंग कसे लावावेत हे जाणणारी माणसे तुमच्याकडे असतील तर आम्हाला अशा लोकांची आणि विशेषतः सुरूंग लावून दगडी भिंत उडविणा-या कसबी लोकांची जरूरी आहे..... तेव्हा आपल्या तिकडे चौकशी करून सुमारे 20/25 किंवा निदान 10/15 सुरूंगे लोक मिळतील तेव्हडे पाठवावे. त्यांना चांगला तनखा देऊन माझ्या अनेक किल्ल्यांवर त्यांना काम देईन व आपले उपकार स्मरीन.''[9]यावरून शिवाजी महाराजांची जागरूकता लक्षात येते व चांगल्या कुशल लोकांची मदत आपल्या बांधकामात ते घेत होते याची प्रचिती येते.

**किल्ल्यांचे प्रशासन :-**

स्वराज्याची मदार किल्ल्यावर आहे हे ओळखून त्यांनी सर्वच किल्ल्यांची चोख व्यवस्था ठेवली होती. प्रत्येक किल्ल्यावर संरक्षण व्यवस्था करताना शिवाजी महाराजांच्या दुरदृष्टीची व चाणाक्षपणाची कल्पना येते. मोगल काळात किल्ल्याचा प्रमुख/ किल्लेदार एकच असे. यामध्ये दगाफटका किंवा फितूरी होण्याची शक्यता असते हे ओळखून शिवरायांनी किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी तीन प्रमुख अधिका-यावर सोपविली होती. सभासदानुसार ''जे जे गड घेतले त्या गडावर राजियाने कारभारी-बंदोबस्ती ऐसी पध्दत घातली की, गडावरि हवालदार एक, सबनीस एक व सरनोबत एक, असे तिघे जन एका प्रतीचे जो कारभार करणे तो तिघांनी एका प्रतीचा करावा...... गडावरि लोक ठेवावे. त्यास दहा लोकांस एक नाईक करावा, नऊ पाईक, दहावा नाईक, येणेप्रमाणे जातीचे लोक ठेवावे..... गडावरि लोक हवालदार व सरनोबत मराठे जातिवंत ठेवावे.....सबनीस ब्राह्मण हुजरातीचे ओळखीचे ठेवावे व कारखानीस परभू ठेवावे.असे एकास एक प्रतिमेळ ठेवावे.एक हवालदाराचे हाती किल्ला नाही. हर एक फितवा-फंदा यास किल्ला कोणाच्याने देववेना ये रीतीने बंदोबस्तीने गडकोटाचे मामले केले. नवी पध्दत घातली.''[10] सारांश तिन्ही जमातीतील लोकांनी एकोप्याने राहून गडाचे रक्षण करावे तसेच एकमेकांवर नियंत्रण राहिल्यामुळे शत्रूशी फंदफितुरी करण्यास वाव मिळू नये, अशी महाराजांची दुरदर्शी धारणा होती. वरील

विवेचनावरून आणखी एक बाब समोर येते ती म्हणजे, शिवाजी महाराज केवळ श्रेष्ठ व्यक्ती परीक्षकच नव्हते तर उच्च श्रेणीचे माणसतज्ञही होते. प्रत्येक किल्ल्यावर 2000 ते 3000 पायदळ, 1000 ते 2000 घोडदळ, तोफखाना, दारूगोळा आणि जनावरांची वैरण यांचा साठा असे.''[11] हे त्यांच्या दुरदर्शीपणाचे द्योतक होय. शिवाजी महाराजांच्या किल्ल्यावरील अशा चोख व्यवस्थेमुळेच शत्रूला किल्ला 6-6 महिने,वर्षभर जिंकता येत नसे.

गडावरील अधिकारी निःस्पृह वृत्तीचे, आपापल्या कामात कुशल आणि स्वामीनिष्ठ असले पाहिजेत असे अमात्यांनी आग्रहाने सांगितले आहे. हवालदाराची किंवा कोणत्याही अधिका-याची जागा वंशपरंपरागत चालू नये याची खबरदारी शिवाजी महाराजांनी घेतलेली दिसून येते. गडावरील मुख्य अधिका-यांच्या ठराविक कालमर्यादेनंतर बदल्या कराव्यात असे अमात्य आग्रहाने प्रतिपादन करतात.

किल्ल्याच्या सभोवतालच्या प्रदेशाचे रक्षण करण्याकरिता शिवाजी महाराजांनी रामोशी, भिल्ल, महार, मांग आदि जमातींचा उपयोग करून घेतला. हवालदाराकडे वेळोवेळी बातमी पुरविण्याचे काम हे लोक करत. शत्रूचे हेर बातमी काढण्यासाठी किल्ल्याच्या जवळपास आल्यास हे लोक त्यांची दिशाभूल करित असत. यावरून हे स्पष्ट होते की, समाजातील सर्वसामान्य व्यक्तींना पारखून त्यांचा उपयोग स्वराज्यनिर्मितीसाठी करणारे शिवाजी हे पहिले राजे होत. याबद्दल इंग्रज कॅप्टन मॅकिनटॉश यांनी केलेली टिपणी शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाची आणखी ओळख होण्यासाठी महत्वाची वाटते. मॅकिनटॉश म्हणतो, ''Shivaji was the first sovereigh to employ Ramoshis as watchman of his fortress & they seem to have performed their duty with loyalty. (Zeal)'' ''किल्ल्याचे पहारेकरी म्हणून रामोशांची नेमणूक करणारा शिवाजी हा पहिला सार्वभौम राजा होय. या लोकांनीही आपले कर्तव्य प्रामाणिकपणे व कळकळीने पार पाडले.''[12] थोडक्यात तत्कालिन समाजातील कनिष्ठ वर्गाला जो आजपर्यंत कोणत्याही प्रवाहात नव्हता अशा वर्गाला स्वराज्याच्या कार्यात सहभागी करून घेऊन शिवरायांनी एक नविन आदर्श निर्माण केला.

**सारांश :-**

मराठ्यांच्या इतिहासामध्ये शिवकाळात राज्यस्थापना, राज्यविस्तार आणि राज्यरक्षण किल्ल्यामुळे झाले हे आपणास निर्विवाद मान्य करावे लागेल. मराठ्यांच्या इतिहासामध्ये किल्ल्यांना विलक्षण महत्व प्राप्त झालेले दिसून येते. शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर या किल्ल्यांनीच मराठा राज्याचे रक्षण केले.इ.स. 1681 मध्ये आपली प्रचंड फौज सोबत घेऊन साक्षात मोगल बादशाहा औरंगजेब दक्षिणेतील राज्य नष्ट करण्याच्या इराद्याने आला. परंतु शिवरायांनी निर्माण केलेल्या किल्ल्यांच्या साखळयांच्या सहाय्याने मराठ्यांनी औरंगजेबाचे सर्व मनसुबे धुळीस मिळविले आणि स्वराज्याचे रक्षण केले. दुर्ग हे राज्याचे अगर राष्ट्राचे महत्वाचे अंग ते जर मजबूत असेल तर प्रचंड अशा परचक्रापासून राष्ट्राचे रक्षण करता येते हे औरंगजेबाच्या अफाट शक्तीला पराभूत करून मराठ्यांनी दाखवून दिले.

दुर्ग हा प्रकार शिवरायांनी महाराष्ट्राच्या जीवनामध्ये इतका मुरवून टाकला की, दुर्गावेगळ्या तत्कालीन महाराष्ट्राची कल्पनाही करता येणे अशक्य आहे. म्हणूनच त्यांच्या नावामागे दुर्गाधिराज हे विशेषण शोभून दिसते. स्वराज्यातील जी जी स्थळे त्यांना दुर्गम व सुंदर वाटली त्या प्रत्येक स्थळी असलेले जुने दुर्ग त्यांनी अधिक उत्कृष्ट बांधले. नवे निर्माण केले व मातीच्या गढ्या पाडून त्याजागी नवीन दुर्ग वसविले.

थोडक्यात शिवाजी महाराजांचे स्मरण आपणास त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वातून सत होत रहाते. त्यांचे प्रशासन, न्यायव्यवस्था, बुध्दिमत्ता, कल्पकता, धाडस, धर्मसहिष्णूता, उत्तम राजनिती, मुत्सद्यीपणा, नितीमत्ता, माणसे ओळखण्याची व जोडण्याची कला अशा

अनेक गुणवैशिष्ट्यांमुळे शिवाजी महाराज सतत स्मरणात राहतात व पुढेही राहतील यात शंका नाही. सर जदुनाथ सरकार यांनी आपल्या 'हाऊस ऑफ शिवाजी' या ग्रंथात शिवाजी राजांचे स्मरण आपणास सतत का राहिले पाहिजे हे विशद केले आहे. सरकार म्हणतात, ''आठ विविध भाषांतून उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा बारकाईने विचार केला असता, शिवाजी राजांच्या इतिहासकाराला हे मान्य करावे लागेल की, शिवाजी हा केवळ मराठा-राष्ट्रनिर्माता नव्हता तर मध्ययुगीन हिंदुस्थानातील तो एक श्रेष्ठ रचनात्मक कार्य करणारा अत्यंत बुध्दीमान माणूस होता. (The greatest constructive quies of medieval India) राज्य नष्ट होतात, साम्राज्यांचे विघटन होते, राजघराणी लुप्त होतात; परंतु कालातीत ऐतिहासिक वारसा म्हणून 'लोकनेता राजा' या नात्याने शिवाजी राजांचे स्मरण अखिल मानवजातीला दीर्घकाळ सचेतन करणारे, कल्पनाशक्तीला चेतवणारे, बुध्दीला स्फुरण देणारे आणि अति उच्च पराक्रम करण्यास उद्युत्क करणारे असे राहिल.[13] अशा या महानायकाने आपली संपूर्ण हयात राष्ट्र उभारणी, राज्य संरक्षण व विस्तार आणि लोकोपयोगी कार्यासाठी खर्च केली. त्यांनी ख-या अर्थाने 'रयतेचे राज्य' निर्माण केले. हे राज्य निर्माण करत असताना दुर्गांना केंद्रस्थानी मानून आपल्या स्वराज्यात गडकोटांची साखळी तयार केली. हीच साखळी पुढे मराठ्यांच्या स्वातंत्र्य लढ्यात राज्य रक्षणासाठी उपयुक्त ठरली.गडकोट हे शिवरायांच्या स्वराज्याचा प्राण होते. शिवाजी महाराज हे केवळ दुर्गप्रेमी होते असे नाही, तर ते दुर्गनिर्मिती शास्त्राचे तज्ज्ञ होते.त्यांच्याइतका दुर्गशास्त्राचा अभ्यास अन्य कोणी केल्याचा इतिहासात दाखला नाही.

**निष्कर्ष :-**

1) शिवकाळात दुर्ग/ किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्व होते.
2) शिवकालिन दुर्गरचनेत स्वराज्यहित, व्यावहारिकता, स्वराज्यरक्षण, उपयुक्तता इ. वर अधिक भर होता.
3) मंदिर स्थापत्यापेक्षा दुर्ग स्थापत्याकडे शिवकाळात अधिक लक्ष दिले.
4) किल्ले उभारणीमागे जनहित व स्वराज्य संरक्षण हा उदात्त व व्यापक दृष्टीकोण होता.
5) शिवाजी महाराजांनी तळागाळातील सर्वसामान्य लोकांना स्वराज्याच्या प्रवाहला आणून नविन आदर्श निर्माण केला.
6) गडकोट हा शिवरायांच्या स्वराज्याचा आत्मा होता.
7) शिवरायांचे स्वराज्य हे राजेशाहीत लोकशाहीचे दर्शन घडविणारे होते.

**संदर्भ सूची :-**

1) सावंत बी.एस, जाधव व्ही.के., मराठ्यांचा प्रशासकीय आणि सामाजिक, आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 1997, पृ.136.

2) खोबरेकर वि.गो., महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड, भाग-1 शिवकाल, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.493.

3) उपरोक्त, पृ.493.

4) पठाण यू.म., (संपा.) श्री शिवप्रभूंचे चरित्र (सभासद बखर), समर्थ प्रकाशन, औरंगाबाद, पृ.82.

5) उपरोक्त, पृ.82.

6) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., (संपा.) मराठ्यांचा इतिहास, खंड-1, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-30, पृ.325-326.

7) खोबरेकर वि.गो., महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड, भाग-1 शिवकाल, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, पृ.499.

8) उपरोक्त, पृ.499,500

9) बेंद्रे वा.सी., छत्रपती शिवाजी महाराज- उत्तरार्ध, पार्श्व पब्लिकेशन, कोल्हापूर, पृ.482,483.

10) पठाण यू.म., (संपा.) श्री शिवप्रभूंचे चरित्र (सभासद बखर), समर्थ प्रकाशन, औरंगाबाद, पृ.17.

11) पवार जयसिंगराव (संपा.), छत्रपती शिवाजी महाराज, स्मृतिग्रंथ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे, पृ.109.

12) सावंत बी.एस, जाधव व्ही.के., मराठ्यांचा प्रशासकीय आणि सामाजिक, आर्थिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती 1997, पृ.142.

13) Sarkar Jadunath, House of Shivaji, 3rd Ed. Calcutta, 1995, P.115.